भा. कृ. अनु. प.- केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान, नागपुर
ICAR-central Institute for Cotton Research, Nagpur
An ISO 9001:2015 Certified Organisation

# कापूस हंगाम २०२६ – २७: साप्ताहिक चौथा पीक सल्ला
# (कालावधी २ जुलै ते ८ जुलै २०२६)

## अ. मृदा आरोग्य, अन्नद्रव्य व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापनाबाबत सर्वसाधारण सूचना

**कापसाचे अधिक उत्पादन मिळवण्यासाठी जमिनीतील पोषकद्रव्यांचे संतुलित व्यवस्थापन, पाण्याचे योग्य नियोजन तसेच नियमित निरीक्षणावर आधारित कीड व रोग व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे**. सर्वसमावेशक आणि एकात्मिक पीक व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब केल्यास पिकाची वाढ जोमदार होते, उत्पादन खर्चात बचत होते आणि कीड व रोगांमुळे होणारे संभाव्य नुकसान टाळता येते.

### मृदा आरोग्य व अन्नद्रव्य व्यवस्थापन (एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन– INM)

- **प्रमुख अन्नद्रव्यांच (NPK) संतुलित व्यवस्थापन:**
  जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी पीक फेरपालट, सेंद्रिय खतांचा वापर, शेणखत, कंपोस्ट, हिरवळीचे खत इ.( वापर तसेच आच्छादन पिकांचा अवलंब करावा. पेरणीपूर्वी मातीची तपासणी करून त्यानुसार रासायनिक खतांचा संतुलित व शिफारशीनुसार वापर करावा.
- **दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन:**
  जमिनीत गंधक, झिंक, बोरॉन, मँगनीज आणि मॅग्नेशियम यांसारख्या दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास ती मृदा परीक्षणाच्या आधारे ओळखून आवश्यकतेनुसार शिफारशीत प्रमाणात पर्णीय फवारणीद्वारे पूर्तता करावी.

### रोग व्यवस्थापन (एकात्मिक रोग व्यवस्थापन – IDM)

- **प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अवलंब करा**:
  जमिनीद्वारे व पानांद्वारे पसरणाऱ्या रोगांच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी एकात्मिक उपाययोजनांचा अवलंब करावा. यामध्ये शेताची स्वच्छता राखणे, रोगमुक्त बियाण्यांचा वापर करणे तसेच बियाणे व मृदा प्रक्रियेसाठी जैविक बुरशीनाशके आणि जैवखतांचा वापर करावा. त्यामुळे पिकाची वाढ सुदृढ होते व रोगांचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते.
- **पानावरील रोगांचे प्रभावी नियंत्रण**:
  जास्त आर्द्रतेच्या कालावधीत शेताचे नियमित निरीक्षण करावे. वातावरणीय परिस्थिती रोगाचा जलद विकास व प्रसार होण्यास अनुकूल असल्यासच शिफारस केलेल्या बुरशीनाशकांचा विवेकपूर्ण वापर करावा.

## कीड व्यवस्थापन )एकात्मिक कीड व्यवस्थापन – IPM)

- **शेताची नियमित पाहणी करा :**
  दर आठवड्याला शेताची नियमित पाहणी करून मावा, तुडतुडे, फुलकिडे (थ्रिप्स), लाल कोळी तसेच बोंडअळीसारख्या प्रमुख किडींच्या प्रादुर्भावावर सतत लक्ष ठेवावे.

- **सापळे व जैविक कीडनियंत्रणाचा वापर करा :**
  हंगामाच्या सुरुवातीपासूनच कामगंध (फेरोमोन) सापळे लावून पतंगांच्या हालचालींचे निरीक्षण करावे व अंडी घालण्याच्या कालावधीचा अंदाज घ्यावा. प्रारंभीच्या अवस्थेत जैविक, वनस्पतीजन्य अथवा नैसर्गिक कीटकनाशकांचा वापर करून किडींचे नियंत्रण करावे.

- **मित्र कीटकांचे संवर्धन करा :**
  लेडीबर्ड भुंगे, हिरवे लेसविंग आणि बिग-आयड बग्स यांसारख्या उपयुक्त मित्र कीटकांचे संरक्षण करावे. यासाठी विस्तृत प्रभावक्षेत्र असलेल्या कीटकनाशकांऐवजी शिफारशीनुसार निवडक (Selective) कीटकनाशकांचा वापर करावा.

- **रासायनिक कीटकनाशकांचा विवेकपूर्ण वापर करा :**
  किडींची संख्या आर्थिक नुकसान पातळी गाठल्यानंतरच शिफारशीनुसार रासायनिक कीटकनाशकांची फवारणी करावी. अनावश्यक फवारण्या टाळून लेबलवरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

# बी. स्थानविशिष्ट कृषी सल्ला

| महाराष्ट्र | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | | | | पुढील आठवड्यात अंदाजे पाऊस (मिमी) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जून | | | | | | | जुलै | | | | |
| | | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 01 | 02 | 03 | 04 | 05 |
| | धुळे | | | | | | | | 2.5 | 3 | 5.5 | 23.4 | 48.4 |
| | नंदुरबार | | | | | | | | 2.9 | 2.6 | 5.1 | 35.5 | 61.8 |
| | जळगाव | 0 | 0 | 0 | 0 | 8 | 0 | 12.4 | 4 | 6.2 | 12 | 32.5 | 24.5 |
| | अहमदनगर | 0 | 10.4 | 0 | 0 | 6.2 | 3.3 | 0 | 4.8 | 6.5 | 9 | 10.5 | 22.1 |
| | औरंगाबाद | 0 | 27.8 | 12.9 | 0.1 | 11.2 | 8 | 0 | 4 | 4.7 | 13 | 12.9 | 16.9 |
| | जालना | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | | 3.5 | 4.1 | 17 | 11 | 11.1 |
|  | बीड | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 4.8 | 11 | 8 | 12.9 |
| | नांदेड | | | | | | | | 2.4 | 8.4 | 12 | 5.8 | 5.8 |
| | परभणी | 0 | 0.3 | 18 | 0 | 1 | 13.5 | 0 | 2.7 | 4.4 | 17 | 7.7 | 8.7 |
| | हिंगोली | | | | | | | | 3 | 8.4 | 20 | 6.3 | 7.6 |
| | बुलढाणा | 58 | 0 | 105 | 0 | 1 | 5 | 0 | 3.6 | 7.4 | 25 | 18.4 | 9.1 |
| | अकोला | 0.3 | 22 | 3 | 1 | 5 | 51 | 7 | 4.6 | 11 | 37 | 9.2 | 7.2 |
| | वाशीम | 13.6 | 88 | 9 | 0 | 0 | 22 | 0 | 3.5 | 11 | 29 | 5.1 | 6.6 |
| | अमरावती | 3.2 | 40 | 73 | 0 | 0 | 5 | 15 | 5.8 | 14 | 61 | 27.5 | 9.6 |
| | यवतमाळ | 6 | 8 | 13 | 0 | 0 | 68 | 0 | 2.8 | 13 | 17 | 6.7 | 5.2 |
| | वर्धा | 8.6 | 38 | 23 | 27 | 0 | 2 | 0 | 6 | 20 | 43 | 7.7 | 5.6 |
| | नागपूर | 28.4 | 7.3 | 0 | 0 | 0 | 35 | | 9.6 | 24 | 31 | 9.9 | 10.5 |
| | चंद्रपूर | 75 | 49 | 6 | 0 | 0 | 0 | 8 | 12 | 18 | 18 | 6.2 | 6.7 |
| पावसाचे प्रमाण आणि रंग कोड | | 0.1 to 2.4 मिमी | | 2.5 to 15.5 मिमी | | 15.6 to 64.4 मिमी | | | | 64.5 to 115.5 मिमी | | 115.6 to 204.4 मिमी | |
| पावसाची श्रेणी | | खूप हलका पाऊस | | तुरळक पाऊस | | मध्यम स्वरूपाचा पाऊस | | | | मुसळधार पाऊस | | अति मुसळधार पाऊस | |

## पीक परिस्थिती

- अकोला येथे कापसाची पेरणी सुरू आहे. मान्सून उशिरा सुरू झाल्यामुळे पेरणीस विलंब झाला आहे. आगामी खरीप हंगामासाठी जमिनीची तयारी पूर्ण झाली असून, नांगरणी, सपाटीकरण, शेणखत टाकणे (FYM) टाकणे इत्यादी सर्व पूर्वमशागतीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. कापूस पेरणीसाठी शेताची आखणी सुरू आहे. सध्या पिकावर कोणत्याही कीड किंवा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आलेला नाही.

- राहुरी येथे सिंचनाखाली पेरणी केलेले कापूस पीक पेरणीच्या वेळेनुसार उगवण, रोपावस्था ते प्रारंभिक शाकीय वाढीच्या अवस्थेत आहे. शेतामध्ये उगवण न झालेल्या ठिकाणी रिकाम्या जागांची भर घालणे आणि झाडांना पाणी देण्याची कामे सुरू आहेत. जिरायती क्षेत्रातील शेतकऱ्यांनी जमिनीची तयारी, नांगरणी, सपाटीकरण, शेणखत टाकणे (FYM) टाकणे इत्यादी पूर्वमशागतीची सर्व कामे पूर्ण केली आहेत. मात्र, अपुऱ्या पावसामुळे बहुतांश जिरायती क्षेत्रातील कापसाची पेरणी अद्याप पूर्ण झालेली नाही. शेतामध्ये काँग्रेस गवत (Parthenium), हरळी, लव्हाळा, दुधी, केना, नागरमोथा, चांदवेल इत्यादी तणांचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. सध्या पिकावर कोणत्याही कीड किंवा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आलेला नाही.

- नांदेड येथे पेरणी केलेले पीक ४ ते २९ दिवसांचे असून ते रोपावस्था ते प्रारंभिक शाकीय वाढीच्या अवस्थेत आहे. उगवण न झालेल्या ठिकाणी रिकाम्या जागांची भर घालणे तसेच विरळणी (थिनिंग) करण्याची कामे सुरू आहेत. जिरायती क्षेत्रातील शेतकऱ्यांनी जमिनीची तयारी, नांगरणी, सपाटीकरण, शेणखत टाकणे (FYM) टाकणे इत्यादी पूर्वमशागतीची सर्व कामे पूर्ण

केली आहेत. जिरायती क्षेत्रात पुरेसा पाऊस झाल्यानंतर कापसाच्या पेरणीस सुरुवात करण्यात येणार आहे. सध्या पिकावर कोणत्याही कीड किंवा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आलेला नाही.

**पीकसल्ला:**

- अकोला परिसरातील शेतकऱ्यांनी ज्या शेतांमध्ये पेरणीनंतर रिकाम्या जागा दिसून येतात, तेथे त्वरित पुनर्पेरणी (गॅप फिलिंग) करावी. ७५-१०० मि.मी. समाधानकारक पाऊस झाल्यानंतरच कापसाची पेरणी करावी. हलक्या जमिनीत बीटी कापसाची लागवड टाळावी. जिरायती क्षेत्रासाठी कमी कालावधीत येणाऱ्या बीटी/बिगर बीटी जाती किंवा संकरित वाणांचा, तर बागायती क्षेत्रासाठी मध्यम उशिरा ते उशिरा येणाऱ्या जाती/संकरित वाणांचा वापर करावा. बाजारातून उपलब्ध बियाण्यांवर बुरशीनाशकाची पूर्वप्रक्रिया केलेली नसल्यास पेरणीपूर्वी बियाण्यास कार्बॉक्सिन ३७.५% + थायरम ३७.५% डीएस @ ३.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे किंवा फ्लक्सापायरॉक्सॅड (३३३ ग्रॅम/लिटर एफएस) @ १.५ मि.ली. प्रति किलो बियाणे किंवा टेट्राकोनॅझोल ११.६% w/w (१२.५% w/v) एसएल @ १.५ मि.ली. प्रति किलो बियाणे यांपैकी कोणत्याही एका बुरशीनाशकाची प्रक्रिया करून मूळकूज व इतर बीजजन्य रोगांपासून संरक्षण करावे. तसेच नत्र स्थिरीकरणासाठी ॲझोटोबॅक्टर आणि स्फुरद उपलब्ध करून देण्यासाठी फॉस्फेट विद्रावक जीवाणू (PSB) @ २०–२५ ग्रॅम प्रति किलो बियाणे यांचीही बीजप्रक्रिया करावी. कापूस पिकात अतिरिक्त उत्पन्न व मृदा सुपीकता वाढविण्यासाठी मूग किंवा उडीद यांची १:१ ओळ प्रमाणात आंतरपीक म्हणून लागवड करावी. मात्र, जमिनीत पुरेसा ओलावा नसताना उगवणीपूर्व तणनाशकांचा वापर करू नये. कापसाच्या प्रकारानुसार शिफारशीत अंतर व खतांच्या मात्रा पाळाव्यात. अर्बोरियम वाणासाठी ६० × १५ किंवा ६० × ३० से.मी. अंतर ठेवून ४०:२०:२० कि.ग्रॅ. एनपीके /हेक्टर, सुधारित हिरसुटम वाणासाठी ६० × ३० से.मी. अंतर व ६०:३०:३० कि.ग्रॅ. एनपीके /हेक्टर, कोरडवाहू बीटी संकरित कापूस यासाठी ९० × ४५ किंवा ९० × ६० से.मी. अंतर व ६०:३०:३० कि.ग्रॅ. एनपीके /हेक्टर, तर सिंचनाखालील बीटी कापूस यासाठी १२० × ३० किंवा १२० × ६० से.मी. अंतर ठेवून १२०:६०:६० कि.ग्रॅ. एनपीके /हेक्टर या शिफारशीनुसार खतांचा वापर करावा.

- राहुरी परिसरातील शेतकऱ्यांनी कापसाची फार लवकर पेरणी टाळावी. ७५-१०० मि.मी. समाधानकारक पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी. ज्या शेतकऱ्यांकडे पुरेशी सिंचन सुविधा उपलब्ध आहे, त्यांनी कापसाची पेरणी सुरू करावी. जिरायती क्षेत्रासाठी कमी कालावधीत येणाऱ्या बीटी/बिगर बीटी जाती किंवा संकरित वाणांचा, तर बागायती क्षेत्रासाठी मध्यम उशिरा ते उशिरा येणाऱ्या जाती/संकरित वाणांचा वापर करावा. बाजारातून उपलब्ध कापसाच्या बियाण्यांवर बुरशीनाशकाची पूर्वप्रक्रिया केलेली नसल्यास, पेरणीपूर्वी कार्बॉक्सिन ३७.५% + थायरम ३७.५% डीएस @ ३.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे किंवा फ्लक्सापायरॉक्सॅड (३३३ ग्रॅम/लिटर एफएस) @ १.५ मि.ली. प्रति किलो बियाणे किंवा टेट्राकोनॅझोल ११.६% w/w (१२.५% w/v) एसएल @ १.५ मि.ली. प्रति किलो बियाणे यांपैकी कोणत्याही एका बुरशीनाशकाने बीजप्रक्रिया करून बीजजन्य रोग व मूळकूज रोगापासून संरक्षण करावे. तसेच नत्र स्थिरीकरणासाठी ॲझोटोबॅक्टर आणि स्फुरद उपलब्ध करून देण्यासाठी फॉस्फेट विद्रावक जीवाणू (PSB) @ २०–२५ ग्रॅम प्रति किलो बियाणे यांची बीजप्रक्रिया करावी. कापसामध्ये मूग किंवा उडीद यांची १:१ ओळींच्या प्रमाणात आंतरपीक घ्यावे. चवळी, मका, सेटारिया (फॉक्सटेल बाजरी) आणि झेंडू यांची सापळा पिके म्हणून लागवड करावी. शेत व शेताचे बांध तणमुक्त ठेवावेत. तसेच शेतात व शेताच्या परिसरातील काँग्रेस गवत (Parthenium) नष्ट करावे, जेणेकरून फुलकिड्यांची (Thrips) संख्या वाढणार नाही आणि टोबॅको स्ट्रीक विषाणू (TSV) रोगाचा प्रादुर्भाव कमी राहील.

- नांदेड परिसरातील शेतकऱ्यांनी जमिनीत पुरेसा ओलावा उपलब्ध झाल्यानंतरच कापसाची पेरणी करावी. कोरडवाहू परिस्थितीत कापसाची लागवड १२० × ४५ सें.मी. अंतरावर करावी. उच्च घनता लागवड पद्धती अवलंबत असल्यास मध्यम अथवा तांबड्या जमिनीत ९० × १५ सें.मी. तर भारी, खोल जमिनीत तसेच सिंचनाखाली ९० × ३० सें.मी. अंतर ठेवावे. पेरणीपूर्वी बियाण्यास कार्बॉक्सिन ३७.५% + थायरम ३७.५% डीएस @ ३.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे किंवा फ्लक्सापायरॉक्सॅड (३३३ ग्रॅम/लिटर एफएस) @ १.५ मि.ली. प्रति किलो बियाणे अथवा टेट्राकोनॅझोल ११.६% w/w (१२.५% w/v) एसएल @ १.५ मि.ली. प्रति किलो बियाणे यांपैकी कोणत्याही एका बुरशीनाशकाने बीजप्रक्रिया करून मूळकूज व इतर बीजजन्य रोगांपासून

संरक्षण करावे. तसेच ॲझोटोबॅक्टर, फॉस्फेट विद्रावक जीवाणू (PSB) आणि पोटॅश विद्रावक जीवाणू (KMB) या जैवखतांची १० मि.ली. प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. सिंचनाखालील कापूस पिकासाठी पेरणीच्या वेळी मूलखत दिले नसल्यास ६०:७५:७५ कि.ग्रॅ. एनपीके प्रति हेक्टर, तर कोरडवाहू कापूस पिकासाठी ४८:६०:६० कि.ग्रॅ. एनपीके प्रति हेक्टर ही मूलखताची मात्रा पेरणीपूर्वी किंवा पेरणीच्या वेळी द्यावी. पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेत तणांचे प्रभावी नियंत्रण करण्यासाठी उगवणीपूर्व अवस्थेत पेंडीमेथालीन ३८.७% सीएस @ ७०० मि.ली. प्रति एकर २०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. शेत व शेताचे बांध तणमुक्त ठेवावेत. तसेच शेतात व शेताच्या परिसरातील काँग्रेस गवत (Parthenium) नष्ट करावे, जेणेकरून फुलकिड्यांची (Thrips) संख्या वाढणार नाही आणि टोबॅको स्ट्रीक विषाणू (TSV) रोगाचा प्रादुर्भाव कमी राहील.

## क. हंगामोत्तर व पेरणीपूर्व करावयाच्या कृषी उपाययोजना

- मागील हंगामातील कापूस पिकाचे अवशेष, खोडे, अर्धवट उमललेली बोंडे तसेच रोग व किडीग्रस्त बोंडे शेतातून पूर्णपणे गोळा करून नष्ट करावीत. उपटलेली कापसाची खोडे शेताच्या बांधावर किंवा परिसरात साठवून ठेवू नयेत. हंगामाच्या शेवटी गुलाबी बोंडअळीच्या शेवटच्या पिढीतील अळ्या प्रामुख्याने बाधित बोंडांमध्ये व पिकाच्या अवशेषांमध्ये सुप्तावस्थेत (हायबरनेशन) राहतात. त्यामुळे अशा अवशेषांचा त्वरित नाश केल्यास गुलाबी बोंडअळीचे जीवनचक्र खंडित होऊन पुढील हंगामातील प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात कमी होतो. तसेच पिकाचे अवशेष नष्ट केल्यामुळे जिवाणूजन्य करपा, मूळकूज आणि विविध बुरशीजन्य पानावरील रोगांचे रोगकारकही कमी होतात, परिणामी पुढील हंगामातील कापूस पिकामध्ये रोगांचा संसर्ग कमी होण्यास मदत होते.
- कापूस बाजार समित्या आणि जिनिंग मिलच्या परिसरात गुलाबी बोंडअळीच्या हंगामोत्तर पतंगांवर तसेच सुप्तावस्थेतून बाहेर पडणाऱ्या पतंगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी **किमान १० कामगंध (फेरोमोन) सापळे** सुमारे **२० मीटर अंतरावर** बसवावेत. सापळ्यातील ल्यूअर वेळोवेळी बदलावेत, जेणेकरून त्यांची कार्यक्षमता कायम राहील. जिनिंग प्रक्रियेदरम्यान नुकसानग्रस्त बियाण्यांमधून बाहेर पडणाऱ्या गुलाबी बोंडअळीच्या अळ्यांचा त्वरित नाश करावा. या उपाययोजनांमुळे बाजार समित्या व जिनिंग मिल परिसरातून जवळील कापूस शेतांमध्ये गुलाबी बोंडअळीचा प्रसार होण्यास प्रभावी आळा बसण्यास मदत होते.
- मान्सूनपूर्व कापसाची पेरणी टाळावी. लवकर पेरणी केलेल्या कापूस पिकामध्ये पाते (स्क्वेअर) व फुले लवकर येतात. मागील हंगामातील सुप्तावस्थेत राहिलेल्या गुलाबी बोंडअळीचे पतंग बाहेर पडल्यानंतर या कोवळ्या पात्यांवर व फुलांवर अंडी घालतात. त्यामुळे लवकर पेरणी केलेले पीक गुलाबी बोंडअळीची नवीन हंगामातील पहिली पिढी विकसित होण्यासाठी अनुकूल ठरते. या किडीचे वेळेवर नियंत्रण न केल्यास पुढील पिढ्यांची संख्या झपाट्याने वाढते आणि वेळेवर पेरणी केलेल्या कापूस पिकामध्ये पाते, फुले व बोंडे येण्याच्या अवस्थेत त्यांचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होऊन प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे शिफारशीनुसार योग्य वेळीच कापसाची पेरणी करावी.
- एप्रिल–मे महिन्यात खोल उन्हाळी नांगरट करावी. त्यामुळे जमिनीत सुप्तावस्थेत असलेल्या गुलाबी बोंडअळीसह इतर किडींच्या अळ्या व कोश (प्युपा) जमिनीच्या पृष्ठभागावर येतात. कडक उन्हामुळे त्यांचा नाश होतो तसेच नांगरलेल्या शेतामागे येणारे पक्षी या अळ्या व कोश खाऊन त्यांची संख्या नैसर्गिकरीत्या कमी करतात. या उपाययोजनेमुळे पुढील हंगामात गुलाबी बोंडअळी, पाने खाणाऱ्या अळ्या तसेच मर, मूळकूज आणि सूत्रकृमी (निमॅटोड) यांसारख्या जमिनीद्वारे पसरणाऱ्या रोग व किडींचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते.
- मागील हंगामात गुलाबी बोंडअळीचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव झालेल्या शेतांमध्ये पीक फेरपालट (Crop Rotation) अवश्य करावा. गुलाबी बोंडअळीचा प्रमुख व एकमेव आश्रयदाता पीक कापूस असल्यामुळे सलग कापूस लागवड टाळून इतर पिकांचा समावेश केल्यास या किडीचे जीवनचक्र खंडित होते व पुढील हंगामातील प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते. तसेच पीक फेरपालट ही पद्धत मर, मूळकूज आणि सूत्रकृमी (निमॅटोड) यांसारख्या

जमिनीद्वारे पसरणाऱ्या रोग व किडींच्या व्यवस्थापनासाठी अत्यंत प्रभावी ठरते. विशेषतः रोगग्रस्त क्षेत्रांमध्ये पीक फेरपालट केल्यास जमिनीतील रोगकारकांचा प्रादुर्भाव कमी होऊन पुढील पिकांचे संरक्षण होते.

- कापसाच्या लागवडीसाठी रसशोषक किडी व प्रमुख रोगांना सहनशील, अल्प कालावधीत परिपक्व होणारे तसेच लवकर तयार होणारे वाण किंवा संकरित वाणांची निवड करावी. अशा वाणांच्या लागवडीमुळे पिकाच्या सुरुवातीच्या वाढीच्या अवस्थेत रसशोषक किडी व रोगांचा प्रादुर्भाव तुलनेने कमी राहतो, त्यामुळे अनावश्यक कीटकनाशके व बुरशीनाशकांच्या फवारण्या टाळता येतात. गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव साधारणतः हंगामाच्या मध्यापासून सुरू होऊन उशिराच्या टप्प्यात वाढत जातो. त्यामुळे अल्प कालावधीत व लवकर परिपक्व होणाऱ्या कापूस वाणांची लागवड केल्यास उशिराच्या हंगामात होणाऱ्या गुलाबी बोंडअळीच्या तीव्र प्रादुर्भावापासून पिकाचे प्रभावी संरक्षण करता येते.
- कापसाची पेरणी जून महिन्यात मान्सूनच्या **८० ते १०० मि.मी. समाधानकारक पावसानंतरच** करावी. बियाण्यांची चांगली उगवण, एकसमान पीक उभे राहणे तसेच उगवणीनंतरच्या सुरुवातीच्या वाढीच्या अवस्थेत दीर्घकालीन पावसाच्या खंडाचा सामना करण्यासाठी जमिनीत पुरेसा ओलावा असणे आवश्यक आहे. योग्य ओलाव्यात पेरणी केल्यास पावसातील दीर्घ खंडामुळे पुन्हा पेरणी करण्याची वेळ येत नाही. जून महिन्यात शिफारशीनुसार वेळेवर पेरणी केल्यास गुलाबी बोंडअळीच्या सुरुवातीच्या प्रादुर्भावाचा धोका कमी होऊन पिकाचे अधिक प्रभावी संरक्षण करता येते.
- गुलाबी बोंडअळीच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये **एकात्मिक कीड व्यवस्थापन (IPM)** या संकल्पनेबाबत व्यापक जनजागृती करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना मान्सूनपूर्व कापूस पेरणी टाळण्याबाबत योग्य मार्गदर्शन करण्यात यावे. तसेच कृषी निविष्ठा विक्रेते, बियाणे विक्रेते व कृषी सेवा केंद्र चालक यांनीही शेतकऱ्यांना शिफारशीनुसार योग्य वेळी पेरणी करण्याचा सल्ला द्यावा. यामुळे शास्त्रशुद्ध कापूस लागवडीचा संदेश अधिक प्रभावीपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून गुलाबी बोंडअळीच्या प्रादुर्भावाचे प्रभावी व्यवस्थापन करण्यास मदत होईल.

The detailed information regarding cotton production technology, e.g., selection of soil, varieties, fertilizer application, sowing methods, irrigation systems, management of weeds, insect pests and diseases, etc. can be availed from an android based **CICR Cotton App** developed by ICAR-CICR, Nagpur. The app can be downloaded free of cost from Google play store. Additionally, the crop growth stage specific and weather based weekly advisory are uploaded on the website of ICAR-CICR (https://cicr.org.in/resource-weekly-advisory) also to be consulted for the benefit of farmers.

**Advisory issued by:**
**Dr. Vijay N. Waghmare**
Director, ICAR-Central Institute for Cotton Research, Nagpur

**Compilation by** Dr. Isabella Agarwal
**Editing Team:**

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. G. T. Behere | Dr. A. S. Tayade | Dr. A. H. Prakash | Dr. S.K. Verma |
| Dr. S.K. Sain | Dr. Rishi Kumar | Dr. Babasaheb B. Fand | Dr. Ramkrushna GI |
| Dr. S.P Gawande | Dr. Shivaj Thube | Dr. R.R. Chapke | |

**Regional language translation**:

| | |
|---|---|
| **Hindi** | : Mr Ghanshyam Deogirikar & Mr Ashutosh Mishra |
| **Punjabi** | : Dr Amarpreet Singh |
| **Tamil** | : Dr. A. Manikandan & Dr. M Saravanan |
| **Telugu** | : Dr L. Rajesh Chaudhary |
| **Marathi** | : Dr Vrushali Deshmukh & Mrs Pooja Ghonge |
| **Gujrati** | : Dr H R. Desai & Dr Vivek Shah |
| **Oriya** | : Dr B. S. Nayak |
| **Kannada** | : Dr Neelkanth Hiremani |